# आढावा : कल्याण डोंबिवली नाट्य चळवळीचा

**जनार्दन ओक**

आजवरच्या कल्याण डोंबिवलीच्या नाट्यचळवळीचा वेध घेताना डोळ्यासमोर प्रथम नांव येतं ते कै. बाबासाहेब राणे यांचं. त्यांच्या राजापूरकर नाटक मंडळीच्या 'संत तुकाराम' या नाटकाने इतिहास घडवला आणि कल्यणात १९१३ साली संत तुकाराम थिएटरची स्थापना झाली आणि या नाट्यगृहात नाटकांचे प्रयोग होऊ लागले.

कल्याणच्या नाटच्य चळवळीची दिशा कै. बाबासाहेब राणे यांनी निश्चित केली असली तरी त्या पूर्वी कै. आण्णासाहेब किर्लोस्कर यांनी या चळवळीचा श्रीगणेशा केला होता, असं म्हणणं चुकीचं ठरणार नाही. सप्टेंबर १९८४ मध्ये त्यांनीच लिहिलेल्या 'रामराज्य वियोग' या नाटकाच्या तालमी कल्याणमध्येच झाल्या होत्या. कै. आण्णासाहेब किर्लोस्करांसारख्या नाट्यतपस्वीच्या आशिर्वादाने कल्याणची नाट्यचळवळ बहरुन आली तर त्यात नवल नव्हते. कल्याणच्या नाट्यचळवळीचा वेध घेताना या दोन दिग्गजांचे स्मरण ठेवणे अगत्याचे आहे.

कल्याणची नाट्यचळवळ खऱ्या अर्थाने सुरू झाली ती १९३४-३५ साली. जॉली सोशल क्लब या संस्थेच्या स्थापनेने. या संस्थेतून कै. माधवराव रानडे, आण्णासाहेब आचवल, ठोसर, पेठे, काणे, नरसोपंत रानडे हे काम करीत. यांतील नरसोपंत रानडे यांना त्यांच्या गोड गळ्यामुळे गंधर्व नाटक कंपनीत काम करण्याचे आमंत्रण आले होते.

तत्पूर्वी १९२६ साली कल्याणमध्ये गायन समाजाची स्थापना झाली होती. रागदारीवर आधारित गानकळा जोपासण्याकरिता या संस्थेचा जन्म झाला असला तरी नाटक व गायन यांचे नाते अतूट आहे. त्यामुळेच संस्थेच्या आर्थिक मजबुतीकरिता संस्थेने एक नाटक करण्याचे ठरविले. ते नाटक होते सौभद्र. राजाभाऊ साठे, त्र्यंबकराव रानडे, बाबूराव टोकेकर, विश्वासराव पटवर्धन, दत्ता केळकर, दामुअण्णा रानडे यांनी त्या नाटकांत प्रमुख भूमिका केल्या.

जॉली क्लबपासून स्फूर्ती घेऊन हिंदसेवक ही आणखी एक नाट्यसंस्था उभी राहिली. या संस्थेतून दाबके, विष्णुपंत जावडेकर, गंगाराम जाधव, रामभाऊ काटदरे, अन्घारे, लक्ष्मण सुकेणकर यांनी आपला अभिनय रसिकांपुढे सादर करून त्यांची मने जिंकली.

रंगभूमीच्या सुरूवातीच्या काळांत स्त्रिया नाटकात भूमिका करीत नसत. पुरूषांनाच स्त्री भूमिका कराव्या लागत असत. अशा त्या काळांत सुकेणकर, जाधव हे स्त्री भूमिका अप्रतिम करीत असत. या संस्थांनी माईसाहेब, पंताची सून, म्युनिसीपालिटी अशी त्या काळी गाजलेली रंगतदार नाटके सादर केली आणि प्रेक्षकांकडून वाहवा मिळविली.

सुरवातीला काहीशी नवशिकी भासणारी कल्याणची रंगभूमी अधिक प्रगल्भ होऊ लागली. नाट्यविषयक ज्ञानाच्या कक्षा विस्तारू लागल्या आणि त्यातून दोन समर्थ अशा संस्थांचा जन्म झाला. फ्रेंड सर्कल आणि नाट्यविकास. फ्रेंड सर्कलची स्थापना १९४२ च्या सुमारास झाली तर नाट्यविकासची १९४५ च्या सुमारास. या दोन्ही संस्था वैष्ट्यपूर्ण होत्या. फ्रेंड सर्कलने बहुतांशी गद्य नाटके सादर केली तर नाट्यविकासने संगीत नाटके. महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धा सुरू झाल्यावर या स्पर्धांत या संस्था भाग घेऊ लागल्या. आपली दखल